# घरडा केमिकल्स लिमिटेड

## गुणवत्ता, पर्यावरण, आरोग्य आणि सुरक्षा धोरण.

प्रक्रियांचा विकास, उच्च दर्जाच्या उत्पादनांची निर्मिती आणि योग्य सेवेद्वारे ग्राहकांना समाधान देऊन व त्यात वृद्धी करण्याबाबत असलेल्या बांधिलकीतून समाजाच्या गरजा पुरवणे हेच घरडा केमिकल्स लिमिटेडचे ध्येय धोरण आहे.

विकत घेतलेला कच्चा माल स्वीकारताना, उत्पादन प्रक्रियांवर देखरेख करताना, आमची उत्पादने तपासणी करून पाठवताना, आम्ही सर्वोच्च गुणवत्ता संस्कृतीचे काटेकोरपणे पालन करतो. वितरण, तपशील, पुरवठ्याच्या अटी, मालाचे वेस्टन व त्यावरील तपशील, हाताळणी आणि साठवणूक यावरही आम्ही तितकाच भर देतो कारण या सर्व गोष्टी अंतिम ग्राहकासाठी महत्त्वाच्या आहेत याची आम्हाला जाणीव आहे. आमचा उत्पादित माल गुणवत्तायुक्त असावा यावर आमचा अढळ विश्वास आहे व याच बहुमोल आणि उदात्त ध्येयासाठी आम्ही प्रामाणिकपणे कार्यरत आहोत.

घरडा केमिकल्स लिमिटेड ही अधिक चांगल्या दर्जाचे जीवन अंगिकारण्यात सहाय्यक होणारी एक जबाबदार संस्था असून पर्यावरणाचे रक्षण करण्यास ती अत्युच्च प्राधान्य देते. नियमित विकास कार्यक्रमांच्या आधारे पर्यावरणाची हानी न होण्याची काळजी घेऊन आम्ही आमच्या व्यवस्थापन पद्धतींमध्ये सातत्याने सुधारणा करतो आणि त्यात आधुनिक संकल्पनांना सामावून घेतो. आम्ही आमचे सर्व कर्मचारी, अभ्यागत आणि भागधारक यांच्या आरोग्यरक्षणाची पुरेशी काळजी घेऊन त्यांना सुरक्षित कार्यक्षेत्र उपलब्ध करून देतो.

आमच्या सर्व प्रक्रियांमध्ये आणि कृतीमध्ये आम्ही ''ग्रीन केमिस्ट्री'' संकल्पना, अधिक स्वच्छ कार्यपद्धतीवर अधिष्ठित गुणवत्ता–पर्यावरण–आरोग्य आणि सुरक्षेच्या वैशिष्ट्यांना, आमच्या पर्यावरणातील उत्सर्गाला नियंत्रित करण्याची पुरेशी काळजी घेऊन अंतर्भूत करतो. साधनसंपत्ती आणि ऊर्जा संधारणाचे उपाय आम्ही प्रस्थापित केलेले आहेत. गुणवत्ता, पर्यावरण, आरोग्य आणि सुरक्षा धोरण प्रणालीप्रति कटिबद्धता हा आमच्या उद्योगाचा अविभाज्य घटक आहे. आमच्या संस्थेला लागू असणाऱ्या कायदेशीर आणि इतर बाबींची न्यूनतम पूर्तता आम्ही करतो पण त्यालाच अंतिम पूर्तता मानत नाही. व्यवस्थापन आणि कर्मचारी यांचे परस्पर सहकार्य आणि सल्लामसलत करून गुणवत्ता, पर्यावरण, आरोग्य आणि सुरक्षा धोरणाच्या संपूर्ण अंमलबजावणीमध्ये आमचे व्यवस्थापन आणि कर्मचारी उत्कृष्टता राखतील याची आम्ही खात्री करतो.

गुणवत्ता, आरोग्य, सुरक्षा आणि पर्यावरण धोरण राबवण्यासाठी उचित साधनांच्या उपलब्धतेची आम्ही खातरजमा करतो आणि या धोरणाच्या अद्ययावततेचा सातत्याने आढावा घेतो. अपघात टाळता येऊ शकतात यावर आमचा पूर्ण विश्वास आहे आणि शून्य अपघात पातळी साध्य करणे हे आमचे ध्येय आहे.

कंपनीच्या सर्व कार्यस्थळांवर गुणवत्ता, आरोग्य, सुरक्षा आणि पर्यावरण धोरणांच्या उद्दिष्टांची खालील प्रमाणे अंमलबजावणी केली जाते.

१. गुणवत्ता, पर्यावरणीय पैलू, व्यावसायिक आरोग्य आणि सुरक्षिततेशी संबंधित असलेल्या सर्व बाबींची कायदेशीर पूर्तता.

२. उत्पादन कार्यक्षमतेत सतत सुधारणा, कचरा कमी करणे, उत्सर्जन आणि स्त्राव कमी करणे आणि सुरक्षा विषयी जोखीम कमी करणे यासाठी गुणवत्ता, आरोग्य, सुरक्षा आणि पर्यावरण ध्येये व उद्दिष्टे निश्चित करून त्याचे पुनरावलोकन करणे.

३. प्रक्रियांचा विकास, संरचना, खरेदी, उत्पादन, देखभाल आणि वेष्टनासंबंधित उचित उपाय योजनांद्वारा दर्जेदार उत्पादन निर्मितीसाठी निर्मल आणि सुरक्षित तंत्रज्ञानाचा विकास.

४. हे धोरण कर्मचारी, कंत्राटदार, अभ्यागत आणि भागधारकापर्यंत पोचवणे. उपकरणांची गुणवत्ता राखण्याकरिता व सुरक्षित कामकाजाचे पालन होण्याकरिता सर्व कर्मचाऱ्यांना आवश्यक माहिती, सूचना व प्रशिक्षण देऊन गुणवत्ता, पर्यावरण, आरोग्य व सुरक्षिततेबाबत सतर्कता वाढवणे.

५. कमीत–कमी ऊर्जेचा वापर, सामग्रीचा वापर, कचरा उत्पादन व प्रदूषण या गोष्टींचे एकत्रीकरण करून प्रभावी व जबाबदार व्यवस्थापनातून कचऱ्याची विल्हेवाट लावणे, लोकांचे व्यवसायिक आरोग्य, पर्यावरणीय सुरक्षा व चिरस्थायी विकास, कमीतकमी उर्जावापर, कमीतकमी मालमत्तेचा वापर व कचरानिर्मिती, प्रदूषण प्रतिबंध, प्रभावी व जबाबदार कचरा व्यवस्थापन, संपत्ती व पर्यावरणाची सुरक्षा, सर्व उपक्रमांमध्ये सुरक्षित कामाची स्थिती व सुरक्षित वर्तनासंबंधी गरजांचे एकात्मिकीकरण.

६. कंत्राटदार आणि अन्य प्रतिनिधींची निवड आणि नियुक्ती, त्यांना योग्य अधिकार देऊन त्यांनी गुणवत्ता, पर्यावरण, आरोग्य आणि सुरक्षा धोरणाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी सुयोग्य निकषांचा अवलंब करणे.

७. सुधारित उत्पादन प्रक्रिया व प्रतिबंधात्मक पैलूंवर नियंत्रण ठेवण्यास अनुकूल अशा संस्कृतीचा विकास करण्याकरता कर्मचाऱ्यांना उद्युक्त करणे तसेच यात कर्मचाऱ्यांचे आरोग्य व सुरक्षा अबाधित राखण्यासाठी सुरक्षा प्रतिनिधींना सहभागी करून घेणे.

८. कामाच्या ठिकाणी आणि दैनंदिन जीवनात सुरक्षित वर्तन आणि निरोगी सवयींना प्रोत्साहन देण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांना प्रेरित करणे.

९. वापरात असलेल्या रसायनांचा व निर्मिती करीत असलेल्या उत्पादनांचा दर्जा तसेच त्यांचे पर्यावरण, आरोग्य आणि सुरक्षेवर होऊ शकणारे संभाव्य परिणाम, त्यावरील संरक्षणात्मक व प्रतिबंधात्मक उपायांविषयी वैधानिक अधिकारी व अन्य सर्व हितसंबंधितांना उचित माहिती देऊन शिक्षित केले जात आहे व त्यांच्याशी सातत्यपूर्ण संपर्कात राहून सल्लामसलत केली जात आहे, याची खातरजमा करणे.

१०. उत्पादन कार्यक्षमता, सुधारित पर्यावरण, व्यवसायिक आरोग्य आणि सुरक्षा कार्यपद्धती साध्य करण्यासाठी उत्पादन प्रक्रिया आणि पद्धतीमध्ये सातत्याने सुधारणा करणे. वापरकर्त्यांच्या गरजा, उत्पादित मालाचे जीवनचक्र, अर्थव्यवस्था आणि तांत्रिक व्यवहार्यता विचारात घेऊन एकात्मिक पद्धतीवर गुणवत्ता, पर्यावरण, आरोग्य आणि सुरक्षा धोरण प्रणालींची कार्यक्षमता सुधारित करणे.

दिवाकर के. शेणॉय
भोगवटादार

आवृत्ती क्रमांकः ०६

दिनांकः ०१. ०५ .२०२०.